# पाचोरा नगरपरिषद कार्यालय पाचोरा

स्टेशन रोड, पाचोरा जि. जळगांव

☎ (०२५९६) २४०१०१, २४०१६६ फॅक्स नं. २४३१५५

Website: www.pachoranp.gov.in, Email: copachora@gmail.com


जा.क्रं./बांध/ ३९२६ /सन २०२१ दिनांक :- १६/३ /२०२१

## -: भागश: भोगवटा प्रमाणपत्र :-

प्रति,

श्री. दुष्यंत प्रविणसागर रावल,
रावल जीन, देशमुखवाडी,
पाचोरा.

पाचोरा नगरपरीषद क्षेत्रातील सिटी सर्व्हे नंबर २६६९ ते २६७२ + २६७९ ते २६८७ + २६८७ अ + २६८८/१ पै. + २६८९ ते २६९३ (एकत्रित भुखंड क्षेत्र ७०१५.८० चौ.मी. पैकी भुखंड क्रं.०१ चे क्षेत्र २५१०.३५ चौ.मी मधुन विकास योजना रस्त्याखालील क्षेत्र वजा जाता निव्वळ क्षेत्र १९३६.२० चौ.मी.) जागेवर वाणिज्य प्रयोजनार्थ व्यापारी संकुल ईमारतीचे बांधकामा करीता नगरपरीषदेने क्रं. १८४० दि. ०६ / १२ /२०१४ अन्वये दिलेल्या बांधकाम परवानगी व मंजुर नकाशाप्रमाणे (क्षेत्र २६३०.२२ चौ.मी.) बांधकामा पैकी तळ व प्रथम मजला (क्षेत्र १४६७.७८ चौ.मी.) बांधकाम आर्किटेक्ट श्री. संजय जी. म्हाळस, नाशिक यांच्या देखरेखी खाली पूर्ण करण्यात आलेले असल्याने सदर वाणिज्य प्रयोजनार्थ पूर्ण करण्यात आलेल्या तळ व प्रथम मजल्याचे बांधकामास खालील अटी व शर्तीस अधिन राहुन भागश: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१) सदर वाणिज्य प्रयोजनार्थ ईमारतीचे बांधकामास नगरपरीषदेने दिलेल्या परवानगी व मंजुर नकाशा प्रमाणे अद्याप लिफ्टची व्यवस्था पूर्ण झालेली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. तेव्हा सदर ईमारतीचे दुस-या मजल्याचे बांधकामा समवेत सदर लिफ्ट व्यवस्थेचे काम प्राधान्याने हाती घेवून पूर्ण करण्यात यावे.

२) नगरपरीषदेच्या मंजुर प्लॅन व्यतीरीक्त वाणिज्य प्रयोजनार्थ ईमारतीचे कोणतेही वाढीव / अतिरीक्त बांधकाम वा फेरबदल करु नये. मंजुर बांधकाम नकाशा व्यतीरीक्त बांधकाम आढळल्यास ते मालक /

भोगवटादार यांनी स्वत:हुन हटविणे बंधनकारक राहील. आणि सदर अनाधिकृत विनापरवानगी बांधकाम महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम तरतुदीच्या अधिन कारवाईस पात्र राहील.

३) व्यापारी संकुल ईमारत मालक / भोगवटादार यांनी ईमारत आवारातील रेन वॉटर हार्वेस्टींग, सांडपाणी नियोजन, कचरा संकलन आणि वृक्ष संवर्धन इ.कामे कायमस्वरुपी सुस्थितीत राखणे बंधनकारक आहे.

४) ईमारती सभोवताल वृक्ष लागवड व ईमारती लगत वाहन पार्किंग मुळे वाहतुक व्हिजीबीलीटी ॲबस्ट्रक्ट होणार नाही. यासाठी दक्षता घेण्यात यावी. पार्किंग नियमांचे पालन करावे. ईमारत आवार व लगतचा परिसर पार्किंग क्षेत्र कायम मोकळे ठेवावे.

५) प्रत्येक फ्लोअरवर सार्वजनिक जिना, वहिवाट वापर आणि आग प्रतिबंध यंत्रणा कायमस्वरुपी सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी. ईमारत वापर सुरु करण्यापूर्वी अग्निसुरक्षा प्राधिकरणाकडून नाहरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

६) व्यापारी संकुल ईमारतीमधील गाळयांमध्ये करावयाच्या व्यवसायाबाबत आवश्यक त्या विहीत परवानग्या / मंजु-या / ना हरकत प्रमाणपत्र इ.साठी स्वतंत्रपणे सबंधीत कार्यालय / विभाग / खात्यांकडून कार्यवाही करुन प्राप्त करुन घेणे मालक / भोगवटादार यांना बंधनकारक राहील.

७) सामासिक अंतरामध्ये कुठल्याही स्वरुपाचे बांधकाम अनुज्ञेय राहणार नाही. ती कायमस्वरुपी प्रकाश व हवेसाठी खुली ठेवण्यात यावी.

८) सदर ईमारतीच्या स्ट्रक्चरल सबंधीची संपूर्ण जबाबदारी भुखंड मालक तसेच आर्किटेक्ट / अभियंता यांची जबाबदारी राहील.

९) भविष्यात सदर ईमारतीचे बांधकामात कुठलाही बदल करावयाचा असल्यास त्यासाठी पाचोरा नगरपरीषदेची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

१०) व्यापारी संकुल ईमारतीमधील कच-यासाठी पर्यावरण अधिनियम १९८६ आणि घनकचरा व्यवस्थापन नियम १९८८ च्या तरतुदीनुसार आणि नगरपरीषद प्रचलीत उपविधीनुसार स्वतंत्रपणे विल्हेवाट / अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. मुख्यत्वे खाद्य पदार्थ, टाकाऊ कचरा सुरक्षितपणे विल्हेवाट करावी. त्यामुळे लगतच्या वहिवाट धारकांना अडचण ठरणार नाही. याची दक्षता घ्यावी.

११) ईमारत परिसर आणि ईमारत विल्हेवाट वापर ईको फ्रेंडली तत्वाच्या अधिन / शासन नियमांच्या अधिन ठेवणे आपणावर बंधनकारक राहील.

मुख्याधिकारी,
पाचोरा नगरपरिषद,पाचोरा
जि.जळगाव.

**प्रत :-** कर अधिक्षक, वसुली विभाग, पाचोरा नगरपरीषद यांचेकडेस व्यापारी संकुल ईमारतीची तपासणी करुन सत्वर कर आकारणी लागु करणेसाठी रवाना.